**MHRG040057872025**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. १७६५/२०२५**
**श्रीमती. देवकी ज्ञानदेव पडघान व इतर**
**विरूध्द**
**कोणीही नाही**

## पाचवे सह. दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, पनवेल, यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारीः आर.वाय.खंडारे यांचे समक्ष)

## निशाणी ०१ खालील आदेश

**०१.** अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज १८२७ च्या बॉम्बे रेग्युलेशन क्र. VIII अन्वये वारस दाखला मिळणेकरिता दाखल केला आहे.

**०२.** अर्जदार क्र. १ हया **मयत ज्ञानदेव पांडुरंग पडघान** यांच्या पत्नी असुन अर्जदार क्र. २ ते ४ हे त्यांची मुले आहेत. मयत ज्ञानदेव पांडुरंग पडघान हे दिनांक ११/०९/२०१३ रोजी मयत झाले आहेत. मयत ज्ञानदेव पांडुरंग पडघान यांची आई गयाबाई पांडुरंग पडघान हया दि. ०५/१०/१९८९ रोजी मयत झालेल्या आहेत. मयत ज्ञानदेव पांडुरंग पडघान यांना अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या व्यतिरिक्त दुसरे कोणीही वारस नाही. मयत ज्ञानदेव पांडुरंग पडघान यांच्या नावावर अर्जाच्या परिच्छेद क्र. २ मध्ये नमुद असलेली मालमत्ता आहे व मयत ज्ञानदेव पांडुरंग पडघान यांच्या मृत्यूनंतर सदर मालमत्तेतील त्यांच्या हिश्श्याला अर्जदार क्र. १ ते ४ यांचे नाव वारस म्हणुन लावण्यासाठी वारस दाखला मिळावा म्हणून अर्जदार क्र. १ ते ४ यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**०३.** अर्जदारांनी **नि.क्र.** ८ प्रमाणे दि. १२/०१/२०२६ रोजी जाहिरनामा व दि. १३/०१/२०२६ रोजी ' किल्ले रायगड' या पेपरमध्ये जाहिर नोटीस दिल्यानंतर ३० दिवसांत कोणीही सदरच्या अर्जास हरकत घेतलेली नाही.

**०४.** वरील कथनास पुष्टी देण्याकरिता अर्जदार यांनी त्यांचे तर्फे अर्जदार क्र.०२ वसंत ज्ञानदेव पडघन यांचे पुराव्याचे शपथपत्र **नि.क्र.११** वर दाखल केले आहे. त्यांने त्याचे वडिल व आजीच्या मृत्युच्या दाखल्यांच्या पडताळलेल्या प्रती **नि. १२ व**

**१३** दाखल केली आहे. त्यांच्या वडिलांच्या नावावर असलेल्या मालमत्तेचा नोंदणीकृत करारनामा क्र. ९१९२/२००४ ची प्रमाणित प्रत **नि. १५** वर दाखल केली आहे. त्यांच्या वडिलांच्या नावावर असलेल्या मालमत्तेचा नोंदणीकृत करारनामा क्र.५९१३/२००७ ची पडताळलेली प्रत **नि. १६** वर दाखल केली आहे. वरील दोन्ही मालमत्तांच्या ताबा पावत्यांच्या पडताळलेल्या प्रती **नि. १७ व १८** दाखल केली आहे. तसेच अर्जदारांच्या आधारकार्ड व पॅनकार्डच्या सत्यप्रती दाखल केली आहेत. **आर्टिकल 'अ'** वर वृत्तपत्रात जाहिर करण्यात आलेली नोटीस दाखल करण्यात आलेली आहे. या व्यतिरिक्त **नि.०८** वर जाहिरनाम्याची बजावणी करण्यात आलेली आहे. अर्जदार यांनी **नि.क्र. १९** वर पुरावा बंद पुरसिस दाखल केली आहे.

**०५.** अर्जदार क्र. १ ते ४ यांनी साक्षीमध्ये सांगितलेल्या कथनास कागदपत्र दुजोरा देतात. **नि.क्र. १५ ते १८** वरील कागदपत्रानुसार सदर प्रकरणातील मालमत्ता मयत ज्ञानदेव पांडुरंग पडघान यांच्या नावाने असल्याचे दिसुन येत आहे. अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या व्यतिरिक्त मयत ज्ञानदेव पांडुरंग पडघान यांना इतर कोणीही वारस नाही. अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या व्यतिरिक्त मयत ज्ञानदेव पांडुरंग पडघान यांना कोणीही वारस नसल्याबाबतचा अर्जदार क्र. १ ते ४ यांचा पुरावा विना आव्हानित असल्यामुळे त्यास शंका घेण्याचे कोणतेही कारण दिसून येत नाही. वरील विवेचनावरून अर्जदार क्र. १ ते ४ हे मयताचे वारस असल्याचे समाधान झाल्यावरून अर्जदार क्र. १ ते ४ हे वारसाचा दाखला मिळविण्यास पात्र असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १ | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २ | अर्जदार क्र. १ **श्रीमती. देवकी ज्ञानदेव पडघान**, अर्जदार क्र. २ **श्री. वसंत ज्ञानदेव पडघन**, अर्जदार क्र. ३ **श्री. मधुकर ज्ञानदेव पडघान** व अर्जदार क्र. ४ **श्री. सुधाकर ज्ञानदेव पडघान** हे **मयत ज्ञानदेव पांडुरंग पडघान** यांचे परिच्छेद क्र.२ मध्ये नमुद मिळकतीमध्ये त्यांच्या हिश्शाचे वारस असल्याचे |

| | |
|---|---|
| | वारस प्रमाणपत्र मिळकतीच्या मुल्यांकनावर योग्य ती कायदेशीर कोर्ट फी आकारून अर्जदार यांना देण्यात यावे. |
| ३ | सदरचे प्रमाणपत्र हे वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) असून ते उत्तराधिकारी प्रमाणपत्र (Succession Certificate) नाही. |
| ४ | नाझर यांनी कायद्याप्रमाणे आवश्यक असलेली कोर्ट फीचा तपशिल द्यावा. |
| ५ | सदर प्रमाणपत्र दिवाणी नियमावली प्रकरण १४ परिच्छेद ३१२ मधील टिपणीस अधीन राहून देण्यात येत आहे. अर्जदार यांनी प्रमाणपत्र प्राप्ती पासून वरील टिपणीस अनुसरून पुढील पूर्तता करावी. |

RAJESH YASHWANTRAO KHANDARE

Digitally signed by RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Date: 2026.04.01 17:43:55 +0530

**दि. ०१/०४/२०२६** **(आर.वाय.खंडारे)**

**पनवेल.** **पाचवे सह दिवाणी न्यायाधिश, व. स्तर पनवेल.**